
ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-2 Issue-11

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-11 May- June 2022

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*May-June Volume-2 Issue-11*

*On*

Chief Editor
P. R. Talekar
Secretary
Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

Editor
Dr. R.R.Jane
Principal
Arts and Commerce College,
Bhisi Tah- Chimur Dist-Chandrapur

Co- Editor
Dr. N.S. Girde
Assistant Professor & Head Dept. of History

*Published by- Young Researcher Association, Kolhapur (M.S), India*

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue. 11 May-June 2022

## CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | महिला सक्षमीकरण<br>**डॉ. संगीता भालचंद्र काटकर** | 1-3 |
| 2 | आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण<br>**प्रा. डॉ. अर्चना दयाराम फेंडरकर** | 4-6 |
| 3 | स्वातंत्रोत्तर काळातील महिला सक्षमीकरणात स्त्री मुक्ती चळवळीतील स्त्रिवादी प्रवाह<br>**डॉ. विजय शंकरराव दिघोरे** | 7-8 |
| 4 | आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण<br>**डॉ. मधुकर वि. नंदनवार** | 9-11 |
| 5 | महिलाओं की शैक्षिक-उन्नति में सावित्रीबाई फूले का योगदान:<br>**डॉ. बृजेन्द्र सिंह बौद्ध** | 12-15 |
| 6 | आधुनिक युग में लैंगिक समानता (Gender Equality in Modern Age)<br>**डॉ. फतेह सिंह** | 16-18 |
| 7 | भारतातील अन्नप्रक्रिया उद्योगातील योजनांमुळे महिलांसाठी विस्तारणाऱ्या प्रगतीच्या वाटा<br>**प्रा.सोनल वसंतराव धानापुने** | 19-20 |
| 8 | महिला सबलीकरण आणि शासनाच्या योजना<br>प्रा. जगताप शालन धर्मराज | 21-23 |
| 9 | महिला सबलीकरण आाणि शासनाचे योजना – एक अभ्यास<br>डॉ.चेतना दत्तात्रय जगताप | 24-26 |
| 10 | भारतीय स्वतंत्रता संग्राम में महिलाओं का योगदान<br>चन्द्रशेखर उसरेठे | 27-28 |
| 11 | भारतातील महिला आणि त्यांचे शैक्षणिक सक्षमीकरण सद्य:स्थिती<br>**सहा.प्रा.सुदेवाड एस.व्ही.** | 29-30 |
| 12 | महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजना<br>**प्रा.डॉ कार्तिक पोळ** | 31-33 |
| 13 | भारतीय अर्थव्यवस्थेत महिला सक्षमीकरण<br>प्रा.डॉ.विठ्ठल निळकंठ ठावरी | 34-36 |
| 14 | आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण<br>**प्रा.डॉ. मुट्टे पी. आर., जाधव रामेश्वर दत्तराम** | 37-39 |
| 15 | महिला सक्षमीकरणात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान<br>**डॉ. सूर्यकांत महादेवराव कापशीकर** | 40-42 |
| 16 | आधुनिक काळात ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण<br>**प्रा. डा. विशाल ड्ब्लु. मालेकार** | 43-46 |
| 17 | भारतीय समाजातील स्त्रियांच्या स्थितीचे अध्ययन<br>**डॉ. अशोक तुकाराम खोब्रागडे** | 47-49 |
| 18 | आधुनिक काळातील महिलांचे क्रिडा क्षेत्रातील सक्षमीकरण<br>प्रा.डॉ.ईश्वर रंदये | 50-52 |
| 19 | वैश्वीकरण की तहत में महिलाओं की स्थिति : हिन्दी उपन्यास के विशेष संदर्भ में<br>**डॉ . जिन्सी जोसफ** | 53-54 |
| 20 | नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री प्रतिमा<br>**प्रदिप केशव चापले, डॉ. नरेंद्र तुकडोजी आरेकर** | 55-57 |
| 21 | महिला सशक्तिकरण में मानवाधिकारों की भूमिका : एक सोच<br>**Mrs. Swapna V. Tayde, Mrs. Kanchan B. Awasthi, Mrs. Ujwala P. Kaware, Miss. Kavita C. Roy** | 58-60 |
| 22 | शिक्षा पर महिलाओं की अधिकारिता।<br>**शुभांगी मिर्गे, विद्या उम्बरकर, अलका वानखड़े, शुभांगी पाली, क्षमा सराफ** | 61-63 |
| 23 | आधुनिक काळातील सुशिक्षित महिलांचे सक्षमीकरण<br>**सुभाष आर. गोंडाणे** | 64-65 |

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.11 May-June 2022

# स्वातंत्रोत्तर काळातील महिला सक्षमीकरणात स्त्री मुक्ती चळवळीतील स्त्रिवादी प्रवाह

**डॉ. विजय शंकरराव दिघोरे**
सहाय्यक प्राध्यापक, भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. चंद्रपूर
Email – vijaydighore@yahoo.com

**सारांश :**

भारतीय समाजातून अस्तित्वात असलेली स्त्री मुक्तीची चळवळ व स्त्रीवादी प्रवाह हे महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे ठरले आहे. सर्व समाजातील स्त्रियांना दुय्यम समजून त्यांचे प्रश्न सारखे असतात त्यामुळे त्यांचे दुय्यमत्व कमी करून त्यांना सक्षम करण्यासाठी वेगवेगळे विचार घेऊन स्त्रीमुक्ती चळवळीतून स्त्रीवादी प्रवाह समोर आले. उदारमतवादी स्त्रीवादी प्रवाह समान शिक्षण, समान संधी, मार्क्सवादी स्त्रीवादी प्रवाहाने स्त्री पुरुष समानता, समाजवादी स्त्रीवादी प्रवाह, जागतिकीकरण व भांडवलाचा परिणाम मनोविश्लेषणात्मक स्त्रीवादी प्रवाहाने स्त्रियांमधील कमतरता यावर भर दिला आहे. या सर्व स्त्रीवादी प्रवाहाचा आधार घेत समाजातील काही स्त्रिया ह्या सक्षमीकरणाकडे वाटचाल करत सक्षम झाल्या आहेत. परंतु भारतीय समाज हा जाती व्यवस्थेवर आधारित असल्यामुळे जातीचा प्रभाव स्त्रियांचा दर्जा व भूमिकेवर पडत असतो. त्यामुळे स्त्रीवादी प्रवाहामधून प्रश्न सोडवण्यासाठी व दर्जा सुधारण्यासाठी झालेले प्रभाव हे उच्च जातीतील शिक्षित स्त्रियांसाठी झाले आहे. असेच लक्षात येते. दलीत स्त्री ही या प्रवाहापासून दूर राहिली आहे त्यामुळे दलीत महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी दलीत स्त्रीवादी दृष्टीकोन अस्तित्वात आला. त्यांनी दलीत स्त्रीयांचे प्रश्न मांडल्यामुळे दलीत स्त्री सक्षमीकरणाकडे वाटचाल करतांना दिसून येते.

**प्रस्तावना :**

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात समाजसुधारकांनी आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही स्त्रियांना समान दर्जा प्राप्त व्हावा यासाठी आणि महिला सक्षमीकरणासाठी शासकीय पातळीवर काही प्रयत्न झालेली दिसून येतात. त्यामध्ये राज्यघटनेतून जी तरतूद केली ती अतिशय महत्त्वाची होती. तसेच स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी व त्यांच्या दर्जातील परिवर्तनासाठी राज्यघटनेचा आधार घेत शासकीय पातळीवरून काही योजना तयार करण्यात आल्या आहेत. भारतीय समाजात स्त्रियांचा दर्जा व परिवर्तन घडवून आणण्यासाठी सर्व पातळीवर विविध प्रकारचे प्रयत्न झालेले असले तरी स्त्री ही पूर्णतः आजही सक्षम झालेली दिसून येत नाही. त्यामुळे स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी व सक्षमीकरणासाठी भारतातील स्त्रियांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडात एकत्र येऊन यासाठीचे प्रयत्न केलेले दिसून येतात. तसेच भारतीय स्त्रीमुक्तीची चळवळ ही अस्तित्वात आलेली आहे. स्त्री मुक्ती चळवळीतून विविध स्त्रीवादी प्रवाह अस्तित्वात आले. त्यांनी स्त्रीयांच्या प्रश्नासंबंधी व स्त्रियांच्या सक्षमीकरणा संबंधी प्रयत्न केलेले दिसून येतात.

**भारतीय समाजातील स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी झालेले प्रयत्न :**

भारतात प्राचीन काळापासून स्त्रीयांच्या दर्जात परिवर्तन व्हावे यासाठी भारतातील सुधारकांनी अनेक प्रयत्न केले व स्त्री स्वातंत्र्यासाठी अनेकांनी पुढाकार घेतला. बाराव्या शतकात महानुभाव पंथाचे श्री. चक्रधर स्वामी स्त्रीचे स्थान पुरुषांच्या बरोबरीत मानत असत. तेराव्या शतकात जनाबाईचे सामाजिक स्थान लक्षात घेतले तर तिने व्यक्तिगत पातळीवर घेतलेली झेप तिच्या अभंगातून प्रत्ययास येते. स्त्रियांचे स्वातंत्र व्यक्तिगत पातळीवरच मर्यादित राहिले. समाजसुधारकांनी स्त्रियांच्या सामाजिक दर्जा व भूमिकात परिवर्तन व्हावे यासाठी महात्मा गौतम बुद्ध, बाळशास्त्री जांभेकर, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, दयानंद सरस्वती, पंडिता रमाबाई, आगरकर, महर्षी कर्वे, महात्मा फुले, सावित्री फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजाराम मोहन रॉय, राजर्षी शाहू, ताराबाई शिंदे, मुक्ता साळवे इ. सुधारकांनी स्त्रियांच्या समानतेसाठी स्त्रियांचे प्रश्न मांडले व ते सोडविण्यासाठी प्रयत्न केले. स्त्रीयांना स्वातंत्र्य प्राप्त करून देऊन त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी, हक्काची जाणीव करून देण्यासाठी आपल्या समाज सुधारणेच्या कार्यातून प्रयत्न केले. त्यांच्या कार्याच्या योगदानात व स्त्रियांचा सामाजिक दर्जा व भूमिकेत परिवर्तनास मदत झाली. महिला सक्षमीकरणाचे ते पहिले पाऊल ठरले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्त्रियांच्या परिवर्तनासाठी समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नामुळे स्वातंत्र प्राप्तीनंतर स्त्री-पुरुष विषमता नष्ट करून दोघांनाही समान हक्क व समान दर्जा मिळावा यासाठी घटनात्मक तरतूद करण्यात आली. त्यानंतर शासकीय पातळीवर अनेक प्रयत्न हे स्त्रीयांच्या दर्जात सुधारणा झाले आहेत. शासकीय पातळीवर कायदे निर्माण करून व महिलांसाठी विविध शासकीय योजना राबवून सुद्धा स्त्रियांना समाजात मिळणारा दुय्यमत्वाचा दर्जा कायम आहे. स्त्रीयांचे प्रश्न, स्त्री अत्याचार, समाजातील लिंगभेद, स्त्री-पुरुष असमानता, स्त्रीभ्रूणहत्या इ. बाबत फारसा बदल झालेला नाही. स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी काही स्त्रियांनीच यासाठी काही संघटितरीत्या तर काहींनी वैयक्तीकरित्या स्त्री-मुक्ती चळवळीच्या माध्यमातून काही प्रयत्न केले. त्यातूनच त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी व दर्जातील परिवर्तनासाठी भारतात स्त्री मुक्ती चळवळ विकसित झाली.

**भारतीय स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी स्त्री मुक्ती चळवळीचे योगदान व स्त्रीवादी प्रवाह :**

भारतातील स्त्रियांचा दर्जा, प्रश्न यांचे वास्तव्य कळण्यासाठी १९७४ ला 'महिला आयोग समिती' चा अहवाल प्रसिद्ध झाला. यातून स्त्रियांच्या स्त्रीतीची वास्तवता समोर आली. पाश्चात देशांमधून स्त्री मुक्तीवर काम करणाऱ्या स्त्रियांच्या संपर्कात भारतातील शिक्षित स्त्रिया आल्या होत्या तिथून स्त्री चळवळीला वेग प्राप्त झाला. पाच्छात स्त्रीमुक्ती चळवळीचा प्रभाव भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीवर पडला. इ.स. १९७५ ला युनेस्कोने 'आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष' जाहीर केल्यामुळे पुण्यात स्त्री मुक्ती संघटना स्थापन केली. या चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांचे प्रश्न, वास्तवता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा उंचावण्याचा देखील प्रयत्न झाला. भारतातील स्त्री मुक्ती चळवळीचा स्वातंत्र्यपूर्व काळात जो प्रयत्न झाला त्यामध्ये

अखिल भारतीय महिला परिषद १९०४, भारत स्त्री महामंडळ १९१०, महिला भारतीय महामंडळ १९१७, हिंद महिला सभा १९१८, भारतीय महिला परिषद १९२५, अखिल भारतीय राष्ट्रीय स्मारक समिती, कायदेभंग चळवळ १९३०-३२, स्त्री सरकार १९४२-४७, तेभांग चळवळ इ. चळवळीतून स्त्रीयांचे प्रश्न सोडवून त्यांना समानतेचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न केले. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात १९६७ नंतर स्त्री-पुरुष समानतेला प्रारंभ झाला. इ.स. १९६९ ला दिल्ली येथील अखिल भारतीय महिला परिषद, महाराष्ट्रातील स्त्री प्रश्नांची मांडणी १९६९ ते १९८५ रोजी पुण्यात पहिली स्त्री मुक्ती परिषद घेण्यात आली. या परिषदेमधुन महाराष्ट्र राज्य संपर्क समिती स्थापन करण्यात आली. भारतात व महाराष्ट्रात स्त्रीया संबंधिचे विचार मांडून वेगवेगळ्या पातळ्यांवर स्त्रीवादी संकल्पना मांडण्यात आल्या. स्त्रियांच्या जीवनातील सर्व क्षेत्रांमध्ये होणारे शोषण व दुय्यमत्व नष्ट करणे हात्र स्त्रीवादाचा उद्देश आहे. स्त्रीवाद जे मांडले गेले ते वेगवेगळया टप्प्यातून विकसित झालेले आहेत. स्त्रीवादी विचारांचा विकास हा चार दशकांच्या टप्प्यांमध्ये झाला आहे.

समाजवादी स्त्रीवादी प्रवाहाने जागतिकीकरण व भांडवलवाद यांचे स्त्रियांवर झालेल्या परिणामांचे विश्लेषण केले तसेच घरकाम शेती व शेतमजूर स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी काम केले. जहालवादी स्त्री प्रवाह १९८० च्या दशकात मांडला. कुटुंबसंस्था, विवाहसंस्था याला विरोध केला आहे. छाया दातार त्याविषयी म्हणतात, 'फेमिनिझम म्हणजे वर्ग, जात, लिंग, वर्चस्व यांचा नि:ष्पात करुन समतेवर आधारित समाज प्रस्थापित करणे होय. शोषण, दुय्यमत्व अनेक बंधने यांची जाणिव करून देणे म्हणून मनोविश्लेषणात्मक स्त्रीवादी प्रवाह विश्लेषण करतो की, स्त्रियांमध्ये तिन कमतरता निर्माण होतात. अहंभाव, आत्मप्रेम आणि लज्जा यामुळेच स्त्रीया जास्त उन्मादशील आणि संवेदनशील बनतात.

स्त्रीमुक्ती चळवळीतील स्त्रीवादी प्रवाहाची मांडणी करून त्या आधारे स्त्रियांचा दर्जा सुधारणा घडवून आणली पण यशस्वीतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे. याचे कारण सर्व स्त्रीवादी प्रवाहांनी लिंगभेद हा एकमेव कारण स्त्री-पुरुष विषमतेचे मानले. समाजव्यवस्थेत स्त्री-पुरुषांची भूमिका विद्यीत करणारे लिंगभेदाबरोबरच वर्णभेद, वंशभेद, जातीभेद इ. घटक महत्वाचे दिसून येतात. स्त्रीयांचे होणारे शोषण, प्रश्न, समस्या देखील वर्णभेदानुसार भिन्न असतात. याच आधारे नवा स्त्रीवादी प्रवाह पाच्छात देशातून पुढे आला.

स्त्रीवादीतील उदारमतवादी, मार्क्सवादी, समाजवादी, जहालवादी, मनोविश्लेषणात्मक इ. विचार प्रवाहाच्या चळवळीतून लिंगभेदाचा आधार घेत समाजातील स्त्रिया लिंगभेदाच्या आधारे कनिष्ठ आहेत अशी मांडणी केली. भारताची समाजरचना ही जातीभेदावर आधारित असल्यामुळे जातीच्या आधारे स्त्रियांचा दर्जा व भूमिका, प्रश्न, शोषण भिन्न भिन्न असते त्याची मांडणी केली. भारतात दलीत स्त्रीवाद हा विकसित झालेला दिसून येतो भारतातील स्त्रियांचे प्रश्न हे जातीव्यवस्थेशी संबंधित असतात. अशीच मांडणी दलीत स्त्रीवादाने केली. भारतातील बहुसंख्य स्त्रिया दलीत, आदिवासी, कष्टकरी वर्गातील आहेत. त्यांचे प्रश्न पुरुषप्रधानतेपेक्षा वर्गीय, वर्णीय, जातीय विषमतेशी संबंधित आहे. भारतीय स्त्रियांचे प्रश्न जातीशी संबंधित असतात. स्त्रियांचा दर्जा व भूमिका निश्चित होतांना जातीचे महत्त्व खुप असलेले दिसून येते तरी देखील भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीतील आतापर्यंत मांडलेल्या वेगवेगळया प्रवाहानी मात्र अशी मांडणी केलेली दिसून येत नाही. इ.स. १९७० ते १९९० या वीस वर्षाच्या काळात देशभरात अनेक स्त्रिया संघटना व स्त्री अभ्यास केंद्र निघाली, परंतु कोणीही स्त्रियांचे प्रश्न जातीशी निगडीत असतात हे मान्य केले नाही. त्यामुळे दलीत स्त्रियांचे प्रश्न जातीवादामुळे सामान्य स्त्रियांच्या प्रश्नाहून वेगळे असतात. दलीत स्त्रियांचे दुःख सर्वसामान्य दुःखा बरोबर असले तरी जातीयवादाचे वेगळे व अधिक चटके देणारे असतात. समाजशास्त्रातील स्त्री अभ्यासक शर्मिला रेंगे यांनी दलीत स्त्रीवाद ही संकल्पना अधिक स्पष्ट केली. स्त्रीयांच्या सक्षमीकरणात प्रामुख्याने स्त्रीवादाने आपले लक्ष केंद्रीत केले आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


1. सोनाळकर वंदना (१९९७) 'स्त्रिया आणि समाज परिवर्तन' प्रकाशन क्रांतिसिंह नानापाटील अकादमी, येवला जिल्हा-नाशिक
2. गोटे शुभांगी (२००४) 'महिला सक्षमीकरण स्वरूप व समस्या' वरद प्रकाशन, औरंगाबाद
3. गर्गी स.मा. (१९९१) 'भारतीय समाज विज्ञान कोष' खंड पाचवा समाज विज्ञान मंडळ, पुणे
4. श्रीवास्तव सुधारानी (१९९७) भारत में महिलाओं की वैधानिक स्थिती कॉमनवेल्थ पब्लिकेशन, नवी दिल्ली
5. भागवत विघृत, परदेशी, प्रतिमा (२०००) 'भारतातील समकालीन कळीचे प्रश्न' - स्त्रीवादी चर्चा विश्वाचा आढावा
6. चव्हाण, प्रवीण, करमकर, प्रीती (जुलै १९९९) 'स्त्रीवादी सिद्धांकन आणि ज्ञान निर्मिती' स्त्री अभ्यास केंद्र, पुणे
7. आर्य, साधवा मेनन, निवेदिता, जीवी, लोकनिता (२००१) 'नारीवादी राजनिती संघर्ष एंव मुद्दे' हिन्दी विश्वविद्यालय, दिल्ली
8. गोखले, सशीला (१९८४) 'स्त्री मुक्ती केव्हा व कशी' प्रकाशन महिला आंदोलन पत्रीका, मुंबई
9. पावडे, कुमुद (मे/जून २००२) 'दलीत स्त्रियांना जाणवणारा जातीयवाद' बायजा प्रकाशन, गणेशखिंड, औध रोड, पुणे
10. रेंगे शर्मिला (नोव्हेंबर १९९८) 'दलीत विमेन टॉक डिफरंटली'